संपादकीय

# मोबाइलचे बील आता चांगलेच वाढणार

मोबाइल, ऑटो तसेच टेलिकॉम क्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये तंत्रविश्वात अनेक लक्षवेधी घडामोडी घडल्या. या घटनांमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे, हे दिसून आले. दुसरीकडे ऑटो जगतातल्या काही महत्त्वपूर्ण बाबींनीही जनसामान्यांचे तसेच ठरावीक वाहनांच्या चाहत्यांचे लक्ष वेधले. बाजारातील विक्रीला तसेच ग्राहकवर्गाच्या पसंतीला नवे आयाम देऊ शकणाऱ्या अशाच काही घडामोडींचा हा खास मागोवा.

गेल्या काही दिवसांमध्ये टेक जगतात लक्षवेधी घडामोडी घडल्या. या घटनांमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे, हे दिसून आले. सार्वत्रिक निवडणुका संपताच दूरसंचार कंपन्यांनी मोबाइलच्या दरात वाढ करण्याची घोषणा केली. जिओ, एअरटेल आणि व्ही या कंपन्याचे रिचार्ज प्लॅन्स १५ ते २० टक्क्यांपर्यंत महाग करण्यात आले. यामुळे ग्राहकांच्या मोबाइलचे बील आता चांगलेच वाढणार आहे. असे असले तरी या दरवाढीमुळे दूरसंचार कंपन्यांना व्यवसाय विस्तारासाठी आणि सेवेचा दर्जा वाढवण्यासाठी अत्यावश्यक असा निधी उभा करता येणार आहे. जिओच्या बाबतीत बोलायचे तर ही कंपनी रिलायन्सच्या छत्रछायेतून बाहेर काढून एक स्वतंत्र ओळख असलेली मोठी कंपनी म्हणूनही मान्यता मिळवू शकते. त्यामुळे सामान्यांना दरवाढीच्या चरकात अडकवले तरी उद्या उत्तम, वैविध्यपूर्ण सेवा देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शिवाय या दरांमध्ये गेली तीन वर्षे कोणतीही वाढ करण्यात आली नव्हती, हेही लक्षात घ्यायला हवे.

जिओ फोनधारकांसाठी दुसरी दखलपात्र बाब म्हणजे 'जिओ सेफ' आणि 'जिओ ट्रान्सलेट' ही दोन ॲप्सही लाँच करण्यात आली आहेत. 'जिओ सेफ'मध्ये व्हीडिओ कॉलर, व्हॉईस कॉलर, मेसेजेस, फाईल ट्रान्सफर असे व्हॉट्सॲपसारखे काही फीचर्स देण्यात आले आहेत. पण महत्त्वाची बाब अशी की, त्यासाठी तुम्हाला दरमहा २०० रुपये मोजावे लागणार आहेत. तर दरमहा ९९ रुपये भरून 'जिओ ट्रान्सलेट' हे ॲप तुम्ही वापरू शकता. हे ॲप एआयचा उपयोग करून व्हॉईस कॉल्स, मेसेजेस भाषांतरीत करते. दरम्यान, एक वर्षासाठी ही दोन्ही ॲप्स ग्राहकांना मोफत मिळणार असल्याची घोषणा 'जिओ'ने केली आहे. दरम्यान, 'बीएसएनएल' कर्नाटकमध्ये फोर-जी नेटवर्क लाँच करणार आहे. कर्नाटकमधील म्हैसूर, मंड्या, चमराजनगर आणि कोडागू येथे हे नेटवर्क लाँच होणार आहे. हे नेटवर्क पुढे जाऊन फाईव्ह-जीमध्ये बदलण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सेवा नीट देता यावी यासाठी या भागात ६९० टॉवर्स बांधण्यात येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले आहे. या भागांमधल्या ७९ जागांवर नेटवर्कच नाही. त्यामुळे इथे नेटवर्क देणारी 'बीएसएनएल' ही पहिलीच कंपनी ठरली.

भारतामध्ये अलीकडेच नवा टेलिकम्युनिकेशन ॲक्ट लागू करण्यात आला. या ॲक्टचे काही विभाग लागू करण्यात आले आहेत. या ॲक्टच्या मुद्द्यांनुसार, सरकारने आणीबाणीची परिस्थिती नीट हाताळण्यासाठी वापरकर्त्यांच्या फोनचे नियंत्रण राखून ठेवले आहे.

या ॲक्टमध्ये वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही नियम आणि अटी लागू करण्यात आल्या आहेत. येणाऱ्या काळामध्ये एखादी व्यक्ती आपल्या नावावर जास्तीत जास्त नऊ सीमकार्ड्स घेऊ शकते. या सोबतच जम्मू आणि काश्मीर तसेच ईशान्य भारतातील नागरिकांसाठी सीमकार्डची मर्यादा नऊपेक्षा कमी ठेवण्यात आलेली आहे. दरम्यान, एखाद्याने नऊपेक्षा जास्त सीमकार्ड्स खरेदी केली तर त्याला ५० हजार रुपयांपर्यंतचा दंड भरावा लागू शकतो.

दरम्यान, ऑटोमोबाइल क्षेत्रातही नवीन घडामोडी घडल्या आहेत. सध्या इलेक्ट्रॉनिक गाड्यांची चलती आहे. इलेक्ट्रिक गाड्यांच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशातच फ्रेंच कार निर्माता कंपनी 'सिट्रोन'ने आपली नवी इलेक्ट्रिक कार 'सी-३ एअरक्रॉस ईव्ही' युरोपियन मार्केटमध्ये लाँच केली आहे.

# विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या देशासाठीच करावा – अमेय गोडबोले

ब्राह्मण संघाचा गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात साजरा

चिपळूण (ओंकार रेळेकर) – ''विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग फक्त आणि फक्त आपल्या देशासाठीच करावा. तसेच आपण घेत असलेले शिक्षण फक्त पैसे कमविण्यासाठी न घेता, त्या शिक्षणाचा उपयोग आपल्या ज्ञानाच्या वाढीसाठी व आपल्या समाजासाठी झाला पाहिजे.'' असे विचार गोडबोलेज् क्लासेसचे अमेय गोडबोले यांनी ब्राह्मण संघाच्या विद्यार्थी गुणगौरव सोहळयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. चिपळूण मधील ब्राह्मण सहाय्यक संघातर्फे गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा रविवारी १४ जुलैला उत्साहात संपन्न झाला. दिवसभर पावसाची संततधार असताना देखील गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने गुणगौरव सोहळयाला उपस्थित होते. गुणगौरव सोहळयात गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, गुलाबपुष्प व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. दरवर्षी ब्राह्मण संघातर्फे चिपळूण व परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा तसेच पदवीधर झालेल्या ब्राह्मण ज्ञातीतील पहिल्या तीन ब्राह्मण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो.

सदर गुणगौरव सोहळ्यात दहावीतील इप्शिता योगेंद्र टिळक, पार्थ प्रसाद चितळे, ऋषिकेश प्रसाद डोंगरे (युनायटेड इंग्लिश स्कूल), शशांक चंद्रेश शुक्ला, निशी संजय त्रिपाठी, आदर्श सानोज बार्थवल (बांदल हायस्कूल), स्वानंद मनोज कुलकर्णी, अनुराधा महेश पटवर्धन




(न्यू इंग्लिश स्कूल, सती), मृण्मयी शशिशेखर कुलकर्णी, सावनी राहूल ओक, गायत्री नरेंद्र फडके, अद्वैत मंगेश जोशी, साजिरी संदिप परुळेकर (एस.पी.एम. परशुराम), चैतन्य मिलिंद सालये, केतकी कल्याण गोंधळेकर, तन्वी महेश बापट, लाघवी चंद्रशेखर सावले, गायत्री प्रमोद मिश्रा (गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल), श्रीयश श्रीराज गणपुले (आर.सी.काळे माध्यमिक विद्यालय, पेढे), आर्या अभिजित बर्वे, सई सचिन भुजंग, श्रीवत्स प्रसन्न कुलकर्णी, शारदा वैभव भाटे (मेरी माता हायस्कूल, खेर्डी), तसेच बारावी वाणिज्य शाखेतील दिया पद्माकर कुलकर्णी, वेद गजानन दाते (गद्रे उच्च माध्यमिक इंग्लिश मिडीयम स्कूल), अद्वैत मनिष कामत (एस.पी.एम. उच्च माध्यमिक इंग्लिश मिडीयम स्कूल), प्रणय मिलिंद गोडबोले, राजस अविनाश वैद्य, संस्कार संजय शुक्ला (डी.बी.जे. महाविद्यालय), शास्त्र शाखेतील श्रावणी संतोष जोशी, कल्याणी विनायक करमरकर, ईशा उदय पंडीत (गद्रे उच्च माध्यमिक इंग्लिश मिडीयम स्कूल), प्रणव प्रसाद जोशी, चैतन्य उदय भागवत (न्यू इंग्लिश स्कूल, सती), प्रिती प्रदिप जठार, श्रावणी योगेश बापट, रुचा मंदार पातकर (डी.बी.जे. महाविद्यालय), बारावी कला शाखेतील आयुष अभय आगवेकर, शाम्भवी अभय पोंक्षे (डी.बी.जे. महाविद्यालय) तसेच बी.कॉम. उत्तीर्ण आदित्य सचिन कान्हेरे, श्रावणी सतीश खरे, अथर्व जितेंद्र गोंधळेकर व आठवी स्कॉलरशिप प्राप्त स्वरांगी प्रमोद जोशी व मेघन तेजानंद गणपत्ये (युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण) या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दहावीत पूर्ण संस्कृत विषयात सर्वोत्तम गुणांसाठी कै. श्रीकांत प्रभाकर गोवंडे पारितोषिक प्राप्त विद्यार्थी म्हणून अद्वैत मंगेश जोशी, सावनी राहूल ओक (एस.पी.एम. उच्च माध्यमिक इंग्लिश मिडीयम स्कूल), पार्थ प्रसाद चितळे, ऋषिकेश प्रसाद डोंगरे, आर्यन दिनेश लांजेकर, श्रेया सुनिल गुरसळे, युक्ता समीर जाधव, श्लोका शैलेंद्र पवार तसेच नववीत पूर्ण संस्कृत विषयात युनायटेड इंग्लिश स्कूल मधील सर्वोत्तम गुणांसाठी कै. भार्गव पांडुरंग चितळे पारितोषिक प्राप्त विद्यार्थी स्वरा मिलिंद विखारे, आर्या जितेंद्र मिरगल या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे दहावी व नववी मधील या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.

या गुणगौरव सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांपैकी स्वरांगी जोशी, गायत्री फडके तसेच पालकापैकी मिलिंद विखारे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ब्राह्मण सहाय्यक संघाचे आभार मानले.

या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून गोडबोलेज् क्लासेसचे अमेय गोडबोले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ब्राह्मण सहाय्यक संघाचे अध्यक्ष अविनाश पोंक्षे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव रमेश चितळे यांनी करताना ब्राह्मण सहाय्यक संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मधुसूदन केतकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.वैशाली चितळे यांनी केले. ध्वनी व्यवस्था संजय नाचणकर व सभागृह व्यवस्था सचिन चितळे यांनी पाहिली. सर्वांना अल्पोपहार व कॉफीची व्यवस्था आदर्श कॅटरिंगचे मंदार काणे यांनी केली.

या कार्यक्रमाला ब्राह्मण संघाचे विश्वस्त आनंद चितळे, उपाध्यक्ष सौ. शीला केतकर, सुधीर पोटे, सचिव रमेश चितळे, सदस्य राजूशेठ कानडे, मिलिंद पिंपुटकर, संजय जोशी, सुनिल जोशी तसेच डॉ. मधुकर जोशी, नित्यानंद भागवत हे उपस्थित होते.

# लोकशाहीत शे.का.प सारख्या बलाढय पक्षाची वाताहत होणे दुर्दैवी – शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाशभाऊ देसाई : शेकापचे अधपतन करण्यात आमदार महेंद्र दळवी यांचीच सरशी – प्रकाशभाऊ देसाई

पाली /बेणसे

(धम्मशील सावंत )

लोकशाहीत विरोधी पक्षाला अनन्यसाधारण महत्व आहे. राज्य आणी देशाच्या राजकारणात एक मजबूत आणी बलाढय आणी मजबूत विरोधी पक्ष म्हणून शेकापने आपले प्रभुत्व कायम ठेवले, मात्र मागील २ दशकाच्या कार्यकाळात शेकापला घरघर लागल्याची अवस्था पहावयास मिळाली. आज शेतकरी कामगार पक्षाची संघटना वाचविण्यासाठी धडपड सुरु असून लोकशाहीत शेकाप सारख्या बलाढय पक्षाची वाताहत होणे दुर्दैवी असल्याचे मत शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाशभाऊ देसाई यांनी सोमवार दि. (१५)रोजी पालीत माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. देसाई पुढे म्हणाले की अलिबाग मुरुड मतदारसंघात दिवसेंदिवस आमदार महेंद्र दळवी यांचे प्रस्थ वाढत गेले. पक्ष संघटनेतील योगदान आणी विकास कामांच्या जोरावर जनतेचे मने जिंकण्यात ते यशस्वी ठरले. शेकापचा एकेकाळचा बालेकिल्ला असलेल्या अलिबाग मुरुड मतदारसंघात शेकापचे अधपतन करण्यात आमदार महेंद्र दळवी यांचीच सरशी असल्याचे प्रकाशभाऊ देसाई यांनी ठासून सांगितले. ङ्गङ्गदेसाई पुढे म्हणाले की विधान परिषद निवडणुकीत शेकापचे जयंत पाटील यांचा मानहानिकारक पराभव झाला. मित्रपक्षांच्या नाराजीचा त्यांना फटका बसला असून शेकापला आता संघटना वाढीस मोठा संघर्ष करण्याची स्थिती येऊन ठेपली.



तर शेकापचे चहुबाजूनी पंख छाटले गेल्याने आमदार महेंद्र दळवी यांच्या विधानसभा निवडणूक जिंकण्याचा मार्ग सुकर झाला असं म्हणावं लागेल. प्रकाशभाऊ देसाई यांनी पुढे म्हटले की शेकाप पक्षसंघटनेची मोठी ताकत मानले जाणारे दाजीबा देसाई, एन. डी. पाटील, दत्ता पाटील, दि. बा. पाटील, प्रभाकर पाटील, कृष्णराव धूळप, गणपतराव देशमुख, मीनाक्षीताई पाटील अशा दिग्गजांचा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाची ओळख राहिली आहे. सत्यशोधक चळवळीतून शेकापची निर्मिती झाली.शेतकरी कष्टकरी, श्रमजीवी, कामगार वर्गाच्या निष्ठावान खांद्यावर शेकाप आजवर भक्कमपने उभा होता. मात्र आता शेकापचा डोलारा हळू हळू काळाच्या ओघात कोसळताना पहायला मिळाला. १९५२ साली सुरु झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत शेकाप महाराष्ट्र आणी देशाच्या राजकीय क्षेत्रात आपली वाटचाल करीत होता. सामाजिक प्रश्नावरील आंदोलने विरोधकांना धडकी भरवायची. महाराष्ट्रात विधी मंडळात शेकापच्या आमदारांची संख्या पाहता लाल बावट्याची ताकत खूप मोठी होती. त्याचा धसका सत्ताधाऱ्यांनाही होता. तगडा विरोधी पक्ष असलेला शेकाप पक्ष आता अस्तित्वासाठी केविलपने धडपडताना दिसतोय हे दुर्दैवी आहे.असे प्रकाश देसाई म्हणाले. मागील २५ वर्षात शेतकरी कामगार पक्षाचे पाच ते सहा आमदार विधिमंडळात सामाजिक प्रश्नावर गरजायचे. यामध्ये माजी मंत्री स्वर्गीय मोहन भाई पाटील,स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील, माजी आमदार जयंत पाटील, माजी आमदार गणपतराव देशमुख,माजी आमदार विवेक पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील आदींचा समावेश होता. एकेकाळी आजी आमदार म्हणून कारकीर्द गाजवलेल्या धडाडीच्या नेत्यांना माजी आमदारांच्या यादीत जावे लागले.रायगड व शेतकरी कामगार पक्ष हेच समीकरण सबंध देशाला ज्ञात होते, मागील इतिहासात शेकापचे पुरोगामी विचारसरणीचे सर्वाधिक आमदार होते, पक्षासाठी सुगीचा काळ होता. कार्यकर्त्यांत उर्मी आणि ऊर्जा होती, नंतरच्या काळात जनता पार्टी चा उगम झाल्यावर शेकापला प्रवाहात घेण्याची मागणी केली, जनता पार्टी सम्पूष्टात आली, शेकाप टिकून राहिला, २००२ पासून अधोगतीला सुरवात झाली, शेकापचे बडे बडे नेते सोडून गेले. शेकापचे मुख्य नेते हे भांडवल शाहीकडे वळले, सर्वसामान्य कार्यकर्ते बेरोजगारीच्या खाईत लोटले जाऊन ते कर्जबाजारी झाले, जिल्हा परिषद सांभाळताना तत्व बाजूला ठेऊन युती आघाडी करण्यात आली त्यातून ऱ्हास व्हायला सुरुवात झाली. भाई दत्ता पाटील, भाई प्रभाकर पाटील यांच्या निर्वाणानंतर आजच्या शेकाप नेतृत्वाला,नेत्यांना पक्ष टिकवता आला नाही. अलिबाग मुरुड च्या शेकापला संपविण्याचे काम महेंद्र दळवी यांनी केले आहे हे सर्वज्ञात आहे. आजचे खासदार रायगडचे नेते सुनिल तटकरे यांनी शेकापला मध्यंतरी हात देण्याचे काम केले, परिस्तिथी नुसार त्यांनी साथ दिली सोडली, यातून शेकापचे अस्तित्व संपुष्टात येत गेले, मागील निवडणुकीत महेंद्र दळवी यांचा पराभव झाला तरी त्यांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले होते, आताच्या लोकसभा निवडणुकीत मतदार संघात ४० हजारच्या मताधिक्याचा फरक लोकसभेला मिळाला याचे श्रेय महेंद्र दळवी यांना जाते, आगामी निवडणुकीत महेंद्र दळवी ५० हजार मतांच्या फरकाने निवडून येतील. असा विश्वास आहे. शेकापची वाईट परिस्थिती झाली, लोकशाहीत इतक्या मोठ्या उंचीचा पक्ष रसातळाला गेला, जयंत पाटील यांचा ठरवून पराभव केला गेला, ही गोष्ट लहान नाही, कर्नाळा बँक प्रकरणात विवेक पाटील सारखा नेता कारागृहात आहे, आरडीसीसी बँकेचे चे आता काय होईल याबाबत ही साशंकता असल्याचे देसाई म्हणाले. विधानपरिषद मध्ये असताना जयंत पाटील यांची आर डी सी सी बँकेला मोठी ताकत मिळत होती. बँकेला पुरस्कार मिळणे हे लेखी कार्यप्रणालीवर अवलंबून असते,जयंत पाटील व उरलेले सहकारी बँक वाचवू शकतील का हा प्रश्न आहे. असे देसाई म्हणाले.

# रायगडच्या डॉक्टरांनी दिला मानवतेचा संदेश, रायगड जिल्ह्यातील नामवंत डॉक्टरांच्या सहभागाने शिहुतील रक्तदान शिबिर यशस्वी : डॉ. पुरुषोत्तम भोईर यांच्या हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन,

पाली/बेणसे
(धम्मशील सावंत)

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. विज्ञान तंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्रात अगणित प्रगती साधली असली तरी मानवी रक्ताला आजवर दुसरा पर्याय निर्माण झाला नाही. रक्तदानाचे महत्व लक्षात घेऊन शिहू येथील डॉ. पुरुषोत्तम भोईर यांच्या हॉस्पिटलमध्ये नुकतेच रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते. रायगड मेडिकल असोसिएशन व रोहा तालूका मेडिकल चॅरीटेबल असोसिएशन, रायगड अलिबाग रक्तपेढी यांच्या सहकार्याने व डॉ. पुरुषोत्तम भोईर, माजी आर. एम.ए.सेक्रेटरी यांच्या विशेष प्रयत्नाने एक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले . सदर शिबिराला प्रारंभ करताना प्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करून श्री गणेशाचे, व आरोग्य देवता धन्वंतरी देवतेचे पुजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांमधील चे अध्यक्ष डॉ. निशीगंधा आठवले व चे माजी अध्यक्ष डॉ. रोहिदास शेळके यांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. परिसरातील दानशूर व्यक्तीमत्व श्री. प्रसाद दादा भोईर यांनी यावेळी प्रथम रक्तदान देण्याचा बहुमान



मिळविला. तदनंतर एकूण ४२ रक्तदात्यानी रक्तदान करून रुग्णांना दिलासा देण्याचे समाजकार्य केले आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व नामवंत डॉक्टरांनी रक्तदान शिबिरात सहभाग दर्शवून मानवतेचे दर्शन घडविले. ङ्ग यावेळी चे सेक्रेटरी डॉ. चांदोरकर आणि उद्योगरत्न, महाराष्ट्र भुषण प्रसाद दादा भोईर यांनी श्री. गणेशाचे पुजन केले. आणि डॉ. राजेंद्र धात्रक, डॉ. सुनील पाटील, डॉ मिलीद धात्रक, डॉ. दिपक गोसावी, डॉ. कोकणे, डॉ. सोष्टे, डॉ. हाफीज, डॉ.पुरुषोत्तम भोईर डॉ. प्रिया भोईर, डॉ. साधना झोलगे, डॉ अश्विनी कुथे यांच्या शुभहस्ते आरोग्याची देवता धन्वंतरीचे पुजन करण्यात आले. तदनंतर लगेचच रक्तदान शिबिराचे उद्घाटन चे अध्यक्ष डॉ. निशिगंधा आठवले, डॉ. रोहिदासजी शेळके. डॉ. चांदोरकर सेक्रेटरी, श्री प्रसाद दादा भोईर, श्री संजय भोईर यांच्या शुभहस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी श्री.के. के कुथे (अप्पा), श्री दामोदर भोईर, श्री. लक्ष्मण खाडे, भाई रमाकांत भोईर, श्री. दिपक पाटील (शिवसेना विभाग प्रमुख) श्री.वसंत मोकल, श्री हिरामण कोकाटे सर, श्री मनोज पाटील, एन.जी पाटील, डॉ. श्री नित्यानंद कुथे, विशाल दिवेकर, श्री दिपक केणी, पो.पा. दिलीप भोईर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पुरुषोत्तम भोईर यांनी व्यासपिठावरील सर्व मान्यवरांचा सन्मान व सत्कार केला. डॉ.सुनिल पाटील यांना आरोग्यम धन संपदा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांचा डॉ. पुरुषोत्तम भोईर यांनी सन्मान केला. रक्तदान शिबिरात रोहा येथील डॉ. म्हात्रे, रोहा तालूका मेडिकल चॅरिटेबल असो.चे सेक्रेटरी डॉ. अतुल पाटील, डॉ. प्रशांत गोसावी, डॉ. निखिल गरुडे, डॉ. साधना झोलगे, इत्यादी डॉक्टरांनी सुध्दा रक्तदान करून जनजागृती केली आहे. सदर शिबिरामध्ये उत्तम योगदान देणाऱ्या रायगड अलिबाग रक्तपेढी मधील डॉक्टर्स टिमचे तसेच या शिबिरासाठी भरीव योगदान देणाऱ्या डॉ. पुरुषोत्तम भोईर यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.ङ्गङ्गअतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सदर रक्तदान शिबिर कार्यक्रम संपन्न झाला. शिबिराचे उत्तम सूत्रसंचालन श्री. विजय सिताराम पाटील यांनी केले.

# तुफान पाऊस; जनजीवन विस्कळीत, काळ, सावित्री व गांधारी नद्यांनी ओलांडली इशारा पातळी

महाड : महाड तालुक्यात गेल्या २४ तासापासून तुफानी पाऊस पडत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. महाड तालुक्यातील काळ, सावित्री व गांधारी



नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून मांडले नदीचे पाणी वाढल्याने महाड रायगड मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी बंद झाला आहे. या रस्त्याला पर्यायी असणारा मोहोप्रे आचळोली मार्ग हा लांबीचा पडत असल्याने काही वाहन चालक आपला जीव धोक्यात घालून आपली वाहने या पाण्यातून नेत आहे. अशा धाडसात एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

महाड तालुक्यात शुक्रवारी सायंकाळ पासून तुफानी पाऊस सुरु असून गेल्या २४ तासात महाड तालुक्यात ११५ मिमी पाऊस झाला आहे. आतापर्यंत तालुक्यात १०४१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. शनिवारी सकाळ पासून पावसाचा जोर वाढला असून सायंकाळ पर्यंत हा जोर कायम असून आणखी ४ ते ५ तास पावसाचा जोर असाच कायम राहीला तर महाड शहरासह तालुक्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते.

महाड रायगड मार्गावरील लाडवली पुलाचे काम अर्धवट अवस्थेत असून या पुलाजवळून काढलेल्या पर्यायी मार्गावरून शुक्रवारी सायंकाळनंतर पाणी जाऊ लागल्याने हा मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी बंद पडला आहे. या रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून मोहोप्रे आचळोली मार्गाचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. परंतु काही वाहनचालक हा लांबचा फेरा वाचवण्यासाठी आपली वाहने लाडवली पुलाजवळील पर्यायी मार्गावरील पाण्यातून नेत आहेत. आज दुपारी अशाच रितीने आपली दुचाकी पाण्यातून नेताना दोघे दुचाकीस्वार थोडक्यात बचावले आहेत.

# कार्लेखिंडीच्या वळणावर अलिबाग-पनवेल एसटी बसला अपघात

अलिबाग : वडखळ-अलिबाग या राष्ट्रीय महामार्गावरील अलिबाग शहर पोलिस ठाणे हद्दीतील कार्लेखिंडीच्या वळणावर आज सकाळी आठच्या सुमारास राज्य परिवहन एसटी महामंडळाच्या अलिबाग-पनेवल या एसटी बसला अपघात झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र



दोघेजण किरकोळ जखमी झाले.अलिबाग आगाराची एम.एच.०७-७३९८ या क्रमांकाची एसटी बस नेहमीप्रमाणे अलिबागहून पनवेलकडे प्रवाशांना घेऊन निघाली होती. कार्लेखिंडमधील मोठ्या वळणावरच्या उतारावर बस येताच बसचा एक्सल तुटल्याने बस चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बसला अपघात झाला. त्यानंतर ही बस तेथील झाडाला अडकल्याने पुढील अनर्थ टळला. जखमींवर अलिबागच्या जिल्हा रुग्णालयात उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. याबाबत अलिबाग शहर पोलिसात नोंद झाली आहे.

# पाणी वाहून जाणार तरी कुठे?

गेल्या पन्नास वर्षांत बहुतेक काळ देशात सर्वात श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेवर अगोदर काँग्रेस आणि नंतर अविभाजित शिवसेना-भाजपाची सत्ता होती. याच काळात राज्यात सुरुवातीला काँग्रेस नंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस (आघाडी) अविभाजित शिवसेना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (महाविकास आघाडी), आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाची (महायुती) सत्ता आहे. गेल्या पाच दशकांत महापालिका व राज्यात सत्तांतराचे अनेक खेळही झाले. डझनभर महापौर आले व गेले, तेवढेच मुख्यमंत्री सत्तेवर आले. कारभारी बदलले व नवीन आले पण देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगराची काळजी सत्ताधाऱ्यांनी पुरेशी घेतली नाही हे खेदाने म्हणावे लागेल. राजकारण व सत्ताकारण चालूच राहणार. सत्ताधारी व विरोधी पक्ष बदलत राहणार पण मुंबई महानगराच्या समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जाणार नसेल, तर राज्यालाच नव्हे तर त्याची किमत देशाला मोजावी लागेल

मुंबई महानगराची लोकसंख्या दीड कोटींच्या घरात आहे. सर्व देशांतून रोजगारासाठी आलेले लोक या महानगरात राहत आहेत. मध्य, पश्चिम व हार्बर मार्गावरील खचाखच भरलेल्या लोकल्स ट्रेनच्या गर्दीतून जीव मुठीत धरून मुंबईकर रोज प्रवास करीत असतात. पंचाहत्तर लाख मुंबईकरांची रोजी-रोटी, मुंबईची जीवनवाहिनी ओळखल्या जाणाऱ्या उपनगरी रेल्वे सेवेवर अवलंबून आहे. ही उपनगरी रेल्वे सेवा खंडित झाली, तर मुंबईत किती हाहाकार उडतो, याची प्रचिती पुन्हा एकदा गेल्या सोमवारी ८ जुलै रोजी आली. रात्री ६ तास कोसळलेल्या मुसळधार पावसाने मुंबई बंद केली. केवळ तीनशे मिमी झालेल्या पावसाने मुंबईची लोकल सेवा ठप्प झाली. रेल्वे मार्गावर व सर्व प्रमुख रस्त्यांवर तसेच लहान-सहान गल्ल्यांमध्ये नि अरुंद रस्त्यांवर पाणीच पाणी साचले. सहा तासांच्या पावसाने मुंबईची तुंबई झाली आणि देशाच्या आर्थिक राजधानीतील दैनंदिन जीवनाची चक्रे बंद पडली.

या देशात मुंबई हे एकच महानगर असे आहे की, ते चोवीस तास चालू असते. रेल्वे रात्री एक-दीडपर्यंत, तर बस, रिक्षा, टॅक्सी आदी वाहने रात्री उशिरापर्यंत कुठेही उपलब्ध असतात. मुंबई हे जसे श्रीमंत व गर्भश्रीमंतांचे शहर आहे, बॉलिवुडचे ग्लॅमर या शहराला आहे तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेचे चलनवलन याच महानगरातून होत असते. देशाला सर्वाधिक महसूल याच मुंबई महानगरातून दिला जातो. मग तीनशे मिमी. पावसाने मुंबईची चाके बंद कशी पडू शकतात? त्याला जबाबदार कोण? एक दिवस मुंबई बंद म्हणजे हजार-दीड हजार कोटींचे नुकसान होते, मग दरवर्षी पावसाळ्यात मुंबईत एकदा-दोनदा ठप्प होते, जनजीवन पूर्ण विस्कळीत होते, उपनगरी रेल्वेसेवा मान टाकते, या मुंबईकरांच्या वेदना कधी थांबणार? दरवर्षी पावसाळ्यात मुसळधार पावसाने मुंबईत अनेक रस्त्यांवर व सब-वेमध्ये पाणी तुंबते. वाहतूक बंद होते, ८ जुलैला तर अनेक रस्त्यांवर अंधेरी, मरोळ, कुर्ला, घाटकोपर, भांडुप, कांजूरमार्ग तसेच लालबाग, परळ, शीव, माटुंगा अशी डझनावरी ठिकाणे तीन ते चार फूट पाण्याखाली होती. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये घराघरांत पाणी शिरले होते. जिथे मेट्रोची, पुलांची व रस्त्यांची कामे चालू आहेत, जिथे निळे पत्रे लावून मोठं मोठे उतुंग टॉवर्स उभारण्याचे काम चालू आहे, तिथे रस्त्यावर मुसळधार पावसाने तलाव निर्माण झाले होते. पाण्याचा निचरा होण्यास मार्ग नसेल, तर पाणी वाहून जाणार तरी कुठे?

महापालिका व राज्य सरकारमधील कारभारी बदलले तरी कर्मचारी, अधिकारी तेच असतात. दरवर्षी पावसाळ्यात पाणी का तुंबते, मुंबईची तुंबई का होते, याचे कारण त्यांना पक्के ठाऊक असते. यावर्षी मुंबईत नालेसफाई ११० टक्के झाल्याचा दावा करण्यात आला होता. स्वत: मुख्यमंत्री व सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांनी नालेसफाईची प्रत्यक्ष पाहणी केली होती. मग एका पावसातच मुंबई का पाण्याने वेढली गेली? सोमवारी विधिमंडळाचे अधिवेशन होते. बाहेरगावाहून येणारे काही मंत्री व आमदारही रेल्वे गाडीत अडकले होते, कोणी रेल्वेतून खाली उतरून रेल्वे मार्गावरून चालत होते, तर कोणी रेल्वेच्या दरवाजात उभे राहून गाडी कधी सुरू होणार याची वाट बघत होते. आमदार व मंत्री अडकले म्हणून त्यांना टीव्हीची प्रसिद्धी मिळाली, पण लक्षावधी मुंबईकर दरवर्षी पावसाळ्यात या यातना भोगतात, त्यावर विधिमंडळात कधी चर्चा होत नाही. महापालिका, रेल्वे, बेस्ट प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना तसेच मुंबई पोलिसांना पावसाळ्यापूर्वी एकत्रित चर्चेला बोलावून मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून काय काय उपाययोजना केली आहे व करायला हवी, यावर दरवर्षी चर्चा होत नाही. राज्य सरकार व महापालिका, रेल्वे, बेस्ट, मुंबई पोलीस यांच्यात समन्वय असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

बॅ. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री असताना त्यांच्या पत्नी नर्गिस या पुण्याला जाताना खंडाळा घाटात वाहतूक कोंडीत अडकल्या होत्या. त्याच सुमारास तत्कालीन ऊर्जामंत्री जयंतराव टिळक हे पुण्याहून मुंबईला येताना खंडाळा घाटात अनेक तास अडकले होते. स्वत: अंतुले यांनी खंडाळा घाटातील वाहतूक कोंडीची दखल घेतली व तातडीने घाटात पर्यायी मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईची तुंबई होते व आर्थिक राजधानीचे जनजीवन ठप्प होते, हा मोठा अपराध आहे असे कुणाला वाटत नाही का? मुंबईचे जनजीवन एक मिनीटही खंडित होता कामा नये, यासाठी राज्यकर्ते ठोस उपाय का शोधत नाहीत? मुसळधार पाऊस असताना समुद्राला भरती सुरू झाली की, मुंबईत पाणी तुंबते, हेच कारण वर्षानुवर्षे ऐकायला मिळत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात यापुढेही दरवर्षी पावसाळ्यात मुंबई तुंबतच राहणार का? दिल्ली, चेन्नई, पाटणा, गुवाहटी अगदी युरोप, अमेरिकेतील शहरांनाही अतिवृष्टीचा फटका बसल्यावर तेथील जनजीवन विस्कळीत होते, पण दरवर्षी नित्यनियमाने पावसाळ्यात ही शहरे नेहमी हमखास पाण्याखाली असतात असे दृश्य दिसत नाही. समुद्राकाठी शहर आहे

# ट्रॅकवर दरड कोसळल्याने कोकण रेल्वे प्रवाशांचे हाल!

रत्नागिरी : गेल्या काही दिवसांपासून कोकणात पावसाने ( ) धुमाकूळ घातला आहे. जोरदार पावसामुळे कोकणात अनेक दुर्घटनाही घडल्या. त्यातच काल कोकण रेल्वे ( ) ट्रॅकवर दरड कोसळल्याने गेल्या १४-१५ तासांपासून रेल्वेसेवा ठप्प झाली आहे, तर अनेक रेल्वेंचे मार्ग बदलण्यात आले आहेत. प्रवाशांना मात्र याची पुरेशी माहिती देण्यात न आल्याने त्यांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यामुळे जाणून घ्या की कोकण रेल्वेच्या कोणत्या गाड्या रद्द केल्या आहेत तसेच कोणत्या गाड्या पर्यायी मार्गाने वळवल्या आहेत.कोकण रेल्वेची वाहतूक ठप्प झाल्याने हजारो प्रवासी सध्या जागोजागी खोळंबले आहेत. बहुतांश प्रवाशांना काल रात्रीपासून खाणे-पिणे मिळालेले नाही. महिला, वृद्ध आणि लहान मुलं यांच्यासह सर्वांचेच हाल झाले आहेत. कोकण रेल्वेच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या ८ गाड्या रद्द, तर १२ ट्रेन इतर मार्गाने वळवण्यात आल्या आहेत.

कोकण रेल्वेच्या कोणत्या एक्सप्रेस ट्रेन रद्द? १) गाडी क्रमांक ५०१०३ दिवा रत्नागिरी पॅसेंजर २) ट्रेन क्रमांक १२१३३ मुंबई सीएसएमटी मंगळुरू जं. एक्सप्रेस

३) गाडी क्रमांक २०१११ मुंबई सीएसएमटी मडगाव जं. ''कोकण कन्या''

४) ट्रेन क्र. ११००३ मुंबई सीएसएमटी मडगाव जं. ''तुतारी'' एक्सप्रेस५) ट्रेन क्रमांक ५०१०४ रत्नागिरी दिवा पॅसेंजर ६) गाडी क्रमांक १२०५१ मुंबई सीएसएमटी मडगाव जं. ''जनशताब्दी'' एक्सप्रेस७) ट्रेन क्रमांक १०१०५ दिवा-सावंतवाडी रोड एक्सप्रेस८) गाडी क्रमांक ५०१०७ सावंतवाडी रोड मडगाव कोणत्या एक्सप्रेस ट्रेनचा मार्ग बदलला जाणार? १) गाडी क्र. १२७४२ पाटणा वास्को दा गामा एक्सप्रेस प्रवास १३/०७/२०२४ रोजी सुरू झाला होता. ही गाडी आता मागे वळवून कल्याण लोणावळा पुणे मिरज लोंडा मार्गे वळवली जाईल२) गाडी क्र. १२६१९ लोकमान्य टिळक (टी) मंगळुरु सेंट्रल एक्स्प्रेसचा प्रवास सुरू झाला होता. ही एक्स्प्रेस ट्रेन आता रोहा येथे पाठीमागून कल्याण लोणावळा पुणे मिरज मार्गे वळवण्यात येईल.३) ट्रेन क्र. १६३३५ गांधीधाम- नगरकोइल जं. १२/०७/२०२४ रोजी एक्सप्रेस प्रवास सुरू झाला होता. आता ही ट्रेन विन्हेरे येथे पाठीमागून कल्याण-लोणावळा-पुणे-मिरज-लोंडा-मार्गे वळवण्यात येईल. मडगाव ठोकूर मंगळुरु जं. ४) गाडी क्र. १२२८४ . निजामुद्दीन एर्नाकुलम एक्सप्रेस प्रवास १३/०७/२०२४ रोजी सुरू झाला होता. ही ट्रेन आता माणगावला पाठीमागून कल्याण-लोणावळा-पुणे-मिरज-लोंडा-मार्गे वळवले जाईल.५) गाडी क्र. १६३४५ लोकमान्य टिळक (टी) तिरुवनंतपुरम सेंट्रल एक्सप्रेसचा प्रवास १४/०७/२०२४ ला सुरू झाला होता. आता करंजाडी येथे पाठीमागे जाईल आणि कल्याण मार्गे वळवण्यात येईल. लोणावळा पुणे मिरज लोंडा मडगाव ठोकूर मंगळुरू जंक्शन एर्नाकुलम.

६) गाडी क्र. २२१५० पुणे जं. एर्नाकुलम जं. एक्सप्रेस प्रवास १४/०७/२०२४ रोजी सुरू झाला होता. ही गाडी आता कल्याण लोणावळा दौंड मार्गे वळवली जाईल. ७) गाडी क्र. १६३४५ लोकमान्य टिळक (टी) तिरुवनंतपुरम सेंट्रल नेत्रावती एक्सप्रेस प्रवास १४/०७/२०२४ रोजी सुरू झाला होता. ही एक्सप्रेस ट्रेन आता कल्याण लोणावळा दौंड जंक्शन मार्गे वळवली आहे.८) गाडी क्र. ०९०५७ उधना मंगळुरू जंक्शन १४/०७/२०२४ रोजी सुरू होणारा विशेष प्रवास वळवण्यात आला आहे. कल्याण लोणावळा दौंड मार्गे.९) गाडी क्र. १२७४२ पटना वास्को द गामा एक्सप्रेसचा प्रवास १३/०७/२०२४ रोजी जिते येथे सुरू झाला आणि कल्याण लोणावळा पुणे मिरज लोंडा-मडगाव मार्गे वळवला जाईल. १०) गाडी क्र. १२६१९ लोकमान्य टिळक (टी) मंगळुरु सेंट्रल एक्स्प्रेसचा प्रवास १४/०७/२०२४ रोजी रोहा येथे सुरू होत असून ती कल्याण-लोणावळा- पुणे- मिरज- लोंडा- मडगाव-ठोकूर मार्गे वळवली जाईल. ११) गाडी क्र. १२२८४ . निजामुद्दीन एर्नाकुलम एक्स्प्रेसचा प्रवास १३/०७/२०२४ रोजी माणगाव येथे सुरू झाला आणि आता ही गाडी कल्याण लोणावळा पुणे मिरज लोंडा मडगाव-ठोकूर मंगळुरु जंक्शन मार्गे वळवली जाईल.१२) गाडी क्र. १६३४५ लोकमान्य टिळक (टी) तिरुवनंतपुरम सेंट्रल एक्स्प्रेसचा प्रवास १४/०७/२०२४ रोजी करंजाडी येथे सुरू होत आहे आणि कल्याण-लोणावळा-पुणे-मिरज लोंडा मडगाव-ठोकूर-मंगळुरु जंक्शन-एर्नाकुलम मार्गे वळवला जाईल.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
मंगळवार, १६ जुलै २०२४


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे



नागोठण्यात पुराचे पाणी घुसल्याने राजदत्त तेरडे, बळाल काळे सह अजिंक्य कोते यांनी छ. शिवाजी महाराज बाजारपेठेतून होडीमधून फेरफटका मारला तो क्षण (छाया-: नारायण म्हात्रे, नागोठणे प्रतिनिधी)

## नागोठणे विभागात ‘‘बहीण माझी लाडकी’’ योजनेपासून बहीणी अनभिज्ञ

नागोठणे -: नारायण म्हात्रे

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण राज्यात ‘‘बहीण माझी लाडकी‘‘ या योजनेची घोषणा केली असून यातून राज्यातील प्रती बहीणीला दर महीन्याला १५०० रु. मिळणार आहेत. या योजनेसाठी काही अटी व नियम ठेवले आहेत व अशा प्रकारचे गावोगावी फॉर्म भरून व शिबिराचे आयोजन केले असून अशा प्रकारचे शिबिर नागोठणे विभागात कुठेही दिसून येत नाही तसेच येथील सामाजिक संस्था कुठेही या कामासाठी व याची माहिती महीलांना पोहोच करण्यासाठी सहभागी झालेले दिसून येत नसल्याचे ऐकायला मिळत आहे. हे शिबिर घेवून बहीणींना पूरेपूर माहीती द्यावी अशा प्रकारचे आदेश त्या त्या स्तरावर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले असून त्या आदेशापासून नागोठणे विभाग कोसो दूर असल्याचे बोलले जात आहे. तसेच या योजनेचा महीलांना पूरेपूर लाभ व्हावा म्हणून काही अटी व नियमांमध्ये शिथिलता आणली असून खेडोपाडी, गावागावातील बहीणींना याचा लाभ मिळून ही योजना सर्वदूर जावी हा मुळ उद्देश आहे. तरी या योजनेसाठी शिबिर घ्यायला पाहिजे अशी महीला भगिनींकडून उत्स्फूर्त मागणी होत आहे.

## उसन्या पैशावरून एकाचा खून

अलिबाग : उसने घेतलेले पैसे परत न केल्याच्या रागातून अलिबाग तालुक्यातील कार्ले गावातील गिरीश कृष्णा पाटील (४४) याला केलेल्या मारहाणीत त्याचा मत्यू झाला. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात मारेकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

गिरीश कृष्णा पाटील असे या मृत व्यक्तीचे नाव असून, तो कार्ले गावचा रहिवासी आहे. गिरीशने पोयनाड येथील राजश्री जयस्वाल यांच्याकडून वीस हजार रुपये उसने घेतले होते. ही रक्कम परत न दिल्याने त्याचा राग धरून जयस्वाल यांच्यासह चौघेजण २९ जून रोजी सायंकाळी पाटील यांच्या घरात घुसले. त्यावेळी झालेल्या वादात आरोपींनी गिरीश पाटील यांना बेदम मारहाण केली. त्यानंतर गावातील पाटील आळीत जाणाऱ्या रस्त्यावर पुलाच्या बाजुला सदानंद पाटील यांच्या घरासमोर आणून पाटील यांच्या डोक्यावर विटेने हल्ला करून गंभीर जखमी केले.

यामध्ये गिरीश पाटील यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यात त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपी जयश्री जयस्वाल, योगेश मोहटे, योगेश सहाणी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून, त्यांना अटक केली आहे.

# रेल्वे स्थानकावर अडकून पडलेल्या प्रवाशांच्या मदतीला पालकमंत्री धावले प्रवाशांच्या जेवणाची, लहान मुलांसाठी केली दुधाची व्यवस्था

रत्नागिरी, (जिमाका) :

काल दिवसभर झालेल्या मुसळधार पावसामुळे कोकण रेल्वे मार्गावरील खेड ते दिवाण खवटी दरम्यान दरड कोसळल्याने यामार्गावरुन धावणाऱ्या अनेक रेल्वे चिपळूण, राजापूर, रत्नागिरी रेल्वे स्थानकावर थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. हे वृत्त समजताच पालकमंत्री उदय सामंत दौऱ्यातूनच रत्नागिरी रेल्वे स्टेशनवर दाखल झाले आणि त्यांनी प्रवाशांच्या जेवणाची, त्यांच्या लहान मुलांसाठी दुधाची व्यवस्था केली. प्रवाशांसाठी त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पालकमंत्री स्वत: रात्री उशीरापर्यंत थांबून होते.ङ्क पालकमंत्री श्री. सामंत यांनी जिल्हा प्रशासन आणि रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपर्क करुन



प्रवाशांसाठी सुविधा करण्याची सूचना केली. प्रांताधिकारी जीवन देसाई, तहसिलदार राजाराम म्हात्रे, पोलीस विभागाचे अधिकारी यांनी तात्काळ २२०० लोकांची जेवणाची व्यवस्था, लहान मुलांच्या दुधाची व्यवस्था, पाणी, आरोग्य व्यवस्था केली. त्याचबरोबर आज सकाळी २००० प्रवाशांना चहा/नाष्टा देण्यात आला. लहान मुलांना दूध/बिस्कीट देण्यात आले. ङ्क पालकमंत्री श्री. सामंत यांनी या प्रवाशांना एसटी बसमधून त्यांच्या पुढील प्रवासाची सोय करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्रशासनाने रत्नागिरी येथून ४०, चिपळूण येथून १६ तर खेड येथून १५ आणि मत्स्यगंधा एक्सप्रेससाठी रत्नागिरी ते पनवेल या मार्गावर २५ एसटी बसेची सुविधा देऊन प्रवाशांना रवानगी केली.

## तारक मेहता का उल्टा चष्मामधील हा कलाकार पुन्हा दिसणार मालिकेत? नाव ऐकून चाहते झाले आनंदी

: टीव्हीवरील प्रसिद्ध सिटकॉम तारक मेहता का उल्टा चश्मा गेल्या जवळपास १६ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. हा एक असा शो आहे जो सर्व वयोगटातील चर्चेत आहेत. आता एक जुना कलाकार पुन्हा मालिकेत दिसणार असल्याची चर्चा रंगली आहे.गेल्या काही वर्षांत अनेक प्रमुख कलाकारांनी तारक मेहता का उल्टा चश्मा



लोकांना पहायला आवडतो.

या मालिकेची कथाच नाही तर त्यातील पात्रांचीही प्रेक्षकांमध्ये चांगलीच चर्चा आहे. या शोमध्ये आतापर्यंत अनेक कलाकार आले आणि गेले, पण गेल्यानंतरही ते चाहत्यांमध्ये या कार्यक्रमाचा निरोप घेतला. त्याचबरोबर हा शो देखील अनेकदा वादांच्या भोवऱ्यात सापडला आहे. दरम्यान, आता या शोमधील एका लीड कलाकाराच्या पुनरागमनाची बातमी समोर येत आहे. या अभिनेत्याचे नाव ऐकून तुम्हीही आनंद होईल.

## पालीतील वरचा देऊळवाडा ग्रामस्थांचा विधायक उपक्रम : स्मशानभूमीची साफसफाई व परिसरात वृक्षारोपण

पाली/बेणसे दि.(धम्मशील सावंत) पालीतील वरचा देऊळवाडा येथील ग्रामस्थ या कामात खूप मेहनत घेतली. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्थांनी एकत्र येऊन



मंडळ यांनी येथील स्मशानभूमीची साफसफाई व स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण हा विधायक सामाजिक कार्यक्रम नुकताच राबवला आहे.

या वृक्षारोपणाकरीता स्थानिक नगरसेविका मधुरा अमीर वरंडे यांनी नगरपंचायत पाली मार्फत ५० वृक्ष उपलब्ध करून दिल्या बद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले. तसेच गावातील वयोवृध्द व तरुणांनी सामाजिक एकोपा जोपासत एक आदर्श घालून दिला आहे. या विधायक उपक्रमासाठी राजाराम चव्हाण (वय ८६), आप्पा चव्हाण, विठोबा गायकवाड, विनायक राऊत, अमित वरंडे, अविनाश अशोक दंत, सुरेश गायकवाड, शुभम वरंडे, आर्यन जाधव, गौरव वाघमारे, संदेश वरंडे, सर्वेश राऊत, सूरज वरंडे या सगळ्यांनी खूप मेहनत घेतली.

# उन्मळुन पडलेल्या सुरू झाडामुळे तवसाळ – जयगड फेरीबोट सेवा बंद : सुवर्णदुर्ग शिपींगच्या कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने २ तासानी फेरी बोट सेवा पुर्ववत : अडचणीच्या काळात उपयोगात येणारा जुना फेरीबोट धक्का दुरुस्त करण्याची मागणी

आबलोली (संदेश कदम)

सततच्या कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे गुहागर तालुक्यातील तवसाळ फेरीबोट सेवेकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री उन्मळून पडलेल्या सुरूच्या झाडामुळे तवसाळ जयगड फेरीबोट सेवा काही काळासाठी बंद होती. या फेरी बोट सेवेचे महत्त्व दैनंदिन कामकाजासाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आयुष्यात महत्त्वाचे आहे. या फेरीबोट सेवेची असणारी गरज लक्षात घेऊन फेरीबोटीचे कर्मचारी, नरवणचे नाटुस्कर बंधू आणि जेएसडब्ल्यू मध्ये कामाला जाणारे कर्मचारी यांनी एकत्रितरीत्या हे सुरूचे पडलेले भले मोठे झाड बाजूला केले. या अडचणीत सुवर्णदुर्ग शिपिंगच्या कर्मचाऱ्यांनी दाखवलेली कार्यतत्परता कौतुकास्पदच होती आणि या सर्वांमुळे ङ्क२ तासाच्या कालखंडानंतर ही फेरबोट सेवा पुरवत सुरू झाली. या फेरीबोटीकडे जाणारा अंदाजे २०० मीटर लांबीचा रस्ता हा सुरूच्या झाडांमधून जातो. खुप वर्षांपूर्वी लावलेले भले मोठे सुरू अति पावसामुळे वादळ वाऱ्यामुळे उन्मळून पडण्याचे प्रकार सततचे होत आहेत. यामुळे फेरीबोट सेवा खंडित होतेच त्याचबरोबर गावातील वीजपुरवठा सुद्धा खंडित होतो. हा मार्ग बंद झाल्यानंतर जुन्या फेरीबोट मार्गाने म्हणजे तवसाळ खुर्द गावातून ही फेरीबोट सेवा वळवण्याचा प्रयत्न कर्मचारी करतात. मात्र या ठिकाणी असणारा जुना फेरीबोट धक्का नादुरुस्त असल्याने येथे बोट लावणे किंवा बोट लावल्यानंतर त्यामध्ये गाड्या चढवणे हे फारच जिकरीचे असते. यामुळे एखादा धोका पण संभवण्याची शक्यता असते. या सर्वांकरता तवसाळ खुर्द येथील जुना फेरीबोर्ड धक्का जर दुरुस्त झाला तर त्याचा पर्याय म्हणून फेरीबोट सेवे करता वापर केला जाऊ शकतो. लोकांची सोय होऊ शकते.फेरीबोट सेवा अखंडितपणे चालू राहू शकते. याचे महत्त्व लक्षात घेऊन तवसाळ गावचे सुपुत्र,जिल्हा नियोजन समिती सदस्य आणि भारतीय जनता पार्टी गुहागर तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यांनी नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये तवसाळ खुर्द येथील जुन्या फेरीबोट धक्क्याची दुरुस्ती करण्याची मागणी सन्मा.पालकमंत्री नाम.उदयजी सामंत साहेब यांच्याकडे केली आहे.



मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई - ४०००८१- अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफिससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत)